Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# "वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेच्या परिप्रेक्ष्यातून श्रीमद्भगवद्गीतेतील तत्वज्ञान : नैतिक पाया"

**प्रा. कविता अनिल बोंडे**
राधिका अध्यापक महाविद्यालय,राजीव नगर, सोमलवाडा, वर्धा रोड, नागपुर 440025

## सारांश

"वसुधैव कुटुंबकम्" ही संकल्पना संपूर्ण मानवजातीला एकच कुटुंब मानणारी असून तिचा नैतिक व तात्विक पाया भारतीय तत्वज्ञानात खोलवर रूजलेला आहे. श्रीमद्भगवद्गीतेतील तत्वज्ञान या संकल्पनेच्या विकसनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मार्गदर्शक ठरते. गीतेतील समत्वबुध्दी निष्कार्म कर्म, सर्वभूतहितरता लोकसंग्रह ही मूल्ये वसुधैव कुटुंबकम् या संकलपनेचा भौतिक पाया घडवतात. कर्माची नैतिकता, समत्व व समानता, स्वधर्म अहिंसा आणि सत्य नैतिक आधार असुरी प्रवृत्तीचां त्याग या नैतिक आचारणावर भर दिला आहे. अशा प्रकारे श्रीमद्भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान वसुधैव कुटुंबकम या संकल्पनेला केवळ आध्यात्मिक विचार न ठेवता, ती आचरणात आणण्यासाठी आवश्यक असा नैतिक पाया प्रदान करते. व्यक्तिगत आत्मविकासातून सामाजिक व वैश्विक कल्याणाकडे नेणारा हा विचार आजच्या जागतिक संदर्भात शांतता, सहअस्तिव व मानवतावाद यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

**प्रस्तावना :** आजच्या जागतिकरणाच्या युगात राष्ट्रामधील परस्परसंबंध अधिक दृढ होत असतात, जागतिक शांतता, आर्थिक स्थैर्य, समावेश विकास आणि मानवी मुल्यांचे संरक्षण या बाबी अत्यंत महत्वाच्या ठरतात. अशा पाश्र्वभूमीवर G20 (Group of Twenty) ही जागतीक स्तरावरील प्रमुख विकसित व धोरणात्मक संवाद आणि जागतिक समस्यांवर सामुहिक उपाय शोधणे हा G20 चा प्रमुख उद्देश आहे. भारताने G20 चे अध्यक्षपद स्वीकारताना आपल्या प्राचीन सांस्कृतिक व तात्विक वारशातून आलेली 'वसुधैव कुटुबकम्'ही संकल्पना जागतिक स्तरावर मांडली. G20 च्या धोरणमध्ये वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना केवळ संस्कृतिक घोषणा न राहता समावेशक विकास, शाश्वतता, मानवकेंद्रीत दृष्टीकोन आणि जागतिक उत्तरदायित्व यांचा मार्गदर्शक तत्व म्हणून प्रतिबिंबित होते. त्यामुळे G20 आणि वसुधैव कुटुंबकम् यांचा संगम हा आधुनिक जागतिक व्यवस्थेसाठी एक नैतिक व तात्विक दिशा दर्शवते. या अनुषंगाने उच्च शिक्षण प्रणालीमध्ये ही 'वसुधैव कुटुंबकम्'संकल्पना समावेशीत करणे गरजेचे झाले आहे.

**वसुधैव कुटुंबकम् संकल्पना :-** 'वसुधैव कुटुंबकम्'ही अतिशय उद्दात्त व सर्वसमावेशक अशी भारतीय संकल्पना आहे. वसुधैव कुटुंबकम् यात तीन शब्दांचा समावेश आहे.

वसुधा - पृथ्वी

एव - नक्कीच/खरोखर

कुटुंबकम् – कुटुंब

म्हणजेच संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटुंब आहे. हा विचार भारतीय उपनिषदापैकी महाउपनिषदामध्ये अध्याय 6 श्लोक क्रमांक 72 मध्ये येतो तो खालीलप्रमाणे:-

।। अयं बन्धुरयं नेति गणना लघुचेतसां

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकं।।

**अर्थ -** हा आपला तो परका अशी भेदभावाची भावना लहान मनाची आहे, उदार मनाच्या लोकांसाठी संपुर्ण पृथ्वी एकच कुटुंब आहे. वसुधैव कुटुंबकम् ही संकल्पना सांगते की सर्व मानव समान आहेत, जाती, धर्म, देश, भाषा हे भेद गौण आहेत म्हणून माझ कुटुंब फक्त घरापुरंत न राहता संपूर्ण मानवजातीपर्यंत विस्तार करण हीच "वसुधैव कुटुंबकम" ची खरी भावना आहे. वसुधैव कुटुंबकम् हा भारतीय उपनिषदांतून निघालेला आदर्श आहे. याचा हेतु मानवतेमध्ये ऐक्य, करुणा आणि सर्वांगीण परिप्रेक्ष्यात हे संकल्पनात्मक चैकट विद्यार्थी शिक्षक, अभ्यासक्रम व शैक्षणिक धारेण आणि सामाजिक नीतिमत्तेसाठी आधार प्रदान करते.

## वसुधैव कुटुंबकम् संकल्पनेचे शैक्षणिक पैलू

**जागतिक नागरिकत्वाची भावना (Global Citizenship) :** शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नाही, तर विद्यार्थ्यांला एका देशाचा नागरिक बनवण्यापेक्षा त्या नागरिकत्वाच्या वृत्तीचा अधिका अधिका विकास घडवुन आणणे.

**मुल्याशिक्षण आणि नैतिकता (Value Education) :** वसुधैव कुटुंबकम् हे तत्व शिक्षणात नैतिक मुल्यांना सवौच्च स्थान देते. समानताः- कोणीही श्रेष्ठ नाही आणि कोणीही कनिष्ठ नाही ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात रुजवते.

**शाश्वत विकास आणि पर्यावारण (Sustainable Development) :** जर पृथ्वी एक कुटुंब असेल, तर तिची संसाधने जपण्याची जबाबदारी सर्वांची आहे.

**सहकार्य आणि शांतता (Cooperation & peace):** आजचे शिक्षण अनेकदा स्पर्धेपेक्षा एकामेकांना सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती निर्माण करते युद्ध किंवा संघर्षपेक्षा प्रश्न सोडण्याचे कौशल्य विकसित करते.

**नैतिकता म्हणजे काय? :** नैतिकता म्हणजे माणसाच्या विचार, भावना आणि कृतींना योग्य-अयोग्याची दिशा देणारी अंतःप्रेरणा व मूल्यव्यवस्था होय. सोप्या शब्दांत सांगायचं तर-मनाने, वाणीने आणि कृतीने योग्य ते करण्याची जाणीव म्हणजे नैतिकता होय. चांगले वाईट ओळखण्याची क्षमता, स्वतःच्या वर्तनावर अंतकःरणाने नियंत्रण व इतरांच्या हिताचा विचार करून वागणे अशा वर्तनाला नैतिकने वागणे असे ओळखले जाते. नैतिकतेचे मुख्य घटकः- सत्य बोलणे,अहिंसा,प्रामाणिकपणा,करूणा,जबाबदारी, नायप्रियता
इ. नैतिकतेचे घटक आहे.भारतीय संस्कृतीमध्ये नैतिकतेला धर्म, सदाचार, नीती असे म्हटले जाते. श्रीमद्भगवद् गीतेतील श्लोकांमध्ये प्रत्येक भारतीय अंतःकरणात नैतिकता निर्माण करून "वसुधैव कुटुंबकम" या संकल्पनेच्या विकसनाचे खूप सामर्थ आहे म्हणून "वसुधैव कुटुंबकम" च्या परिप्रेक्ष्यातून श्रीमद्भवगद्गीतेतील तत्वज्ञानाचा, त्यातील श्लोकांमध्ये दडलेल्या गुढ अर्थांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**श्रीमद्भगवद्गीता :-** भारतीय संस्कृतीमधे साधारपणे चार वेद, 18 पुराणे, 108 उपनिषदे सांगीतले जातात यातील महाभारत हा संस्कृत काव्यग्रंथ महर्षी व्यास यांनी भगवान श्रीगणेशाकडुन लीहून घेतला अशी मान्यता आहे. महाभारतात एकुण 18 पर्व आहे यातील भिष्म पर्वातील अध्याय क्र 25 ते 42 अशा 18 अध्यायात एकुण 700 श्लोकात भगवान श्रीकृष्णंनी अर्जूनााला श्रीमद्भगवद्गीता कुरुक्षेत्राच्या रणांगणावर सांगीतलेली आहे. श्रीमद्भगवद्गीता हा केवळ हिदू धर्माचा ग्रंथ नसून तो संपूर्ण मानवजातीला दिशा देणारा एक सार्वत्रिक (Universal) आणि शाश्वत मार्गदर्शक ग्रंथ आहे. त्याची महती खालील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**जीवनाचे तत्वज्ञान (Philosophy of Life):** गीता केवळ युद्धाचे वर्णन करत नाही, तर ती जगण्याची कला शिकविते मानवी मनातील व्दंद, संभ्रम आणि भीती दुर करुन कर्तव्य कसे पार पाडावे, यांचे मार्गदर्शन यात मिळते म्हणूनच अर्जून एक योद्धा नसून तो गोंधळलेल्या मानवी मनाचे प्रतीक आहे.

**निष्काम कर्मयोग (Selfless Action):** गीतेचा सर्वात महत्वाचा संदेश म्हणजे "कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेतु कदाचन" फळाची अपेक्षा न करता आपले कर्तव्य करत राहणे. हा विचार आजही कॉर्पोरेट जगतापासून ते वैयक्तिक जीवनापर्यंत सर्वांना प्रेरणा देतो. हा सिद्धांत तणावमुक्त जीवनाची गुरुकिल्ली आहे.

**सर्वसमावेशकता आणि समन्वय:** गीतेमध्ये ज्ञानयोग, भक्तीयोग आणि कर्मयोग यांचा सुंदर समन्वय साधला आहे. व्यक्तीच्या प्रकृतीनुसार तिला जो मार्ग सोयीचा वाटेल, त्या मार्गाने ती प्रगती करु शकते हा लवचिक दृष्टीकोन गीतेच्या सार्वत्रिक लोकप्रियेचे मुख्य कारण आहे.

**मानसशास्त्रीय महत्त्व (Psychological Significance) :** आधुनिक मानसशास्त्राच्या दृष्टिने गीता हा एक उत्तम समुपदेशन (Counseling) ग्रंथ आहे. नैराश्य, चिंता आणि व्दिधा मनस्थितीत असलेल्यांना ताकद गीता देते.

**वैश्विक स्वीकृती :** गीतेची महती केवळ भारतापूरती मर्यादित नाही तर जगातील महान विचारवंत जसे की,

**अल्बर्ट आइन्सटाईन:-** जेव्हा मी गीता वाचतो, तेव्हा मला सृष्टीच्या निर्मितीबद्दलचे प्रश्न सुटल्यासारखे वाटते.

**हेनी डेव्हिड थोरो:-** "गीतेच्या तुलनेत आजचे आधुनिक जग आणि त्याचे साहित्य क्षुल्लक वाटते"

**राल्फ वॉल्डो इमर्सन:-** यांनी गीतेवर आधारित Essay on Transcendententalism the over Soul हा ग्रंथ लिहिला ते म्हणतात The Bhargava Gita is an Empire of Thought and its philosophy is the Foundation of many models ideas

**महात्मा गांधी :-** जेव्हा शंकाचे काहुर माजते तेव्हा समोर फक्त नैराश्यच दिसते आणि दूर क्षितीजापर्यंत आशेचा एकही किरण दृष्टिस पडत नाही, तेव्हा मी भगवद्गीतेकडे वळतो आणि एक असा श्लोक शोधतो ज्याचा मला आधार वाटतो आणि अतीव शोकातही माझ्या चेहऱ्यावर स्मितहास्य उमलू लागते.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये श्रीमद्भगवद्गीतेतील खालील श्लोक व त्यातील तत्वज्ञानाचा आधार घेऊन वसुधैव कुटुंबकम् ही भावना जागतीक नैतिकतेसाठी कशी पायाभुत ठरु शकते ते खालील श्लोकातून स्पष्ट होते. जागतिक नैमिकतेचा पहिला नियम म्हणजे दुसऱ्याला तीच वागणूक देणे जी आपल्याला स्वतःला अपेक्षित असते.

आत्मवत सर्वभूतेशू (Empathy) श्लोक 6.32

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन।

सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः।। (6.32)

**अर्थ -** हे अर्जुना, जो स्वतःप्रमाणेच सर्वत्र इतरांच्या सुःख आणि दुःखाकडे समान दृष्टिने पाहतो तोच खरा श्रेष्ठ योगी.

**वसुधैव कुटुंबकम्च्या दृष्टिने नैतिकतेचा पाया:-** दुसऱ्याच्या वेदनांची जाणीव होणे हेच विश्वाला एका सुत्रात बांधणारे कुटुंब बनवते.

**कर्माची नैतिकता (Ethics of Action)**

नैतिकतेचा पाया म्हणजे फळाची अपेक्षा न ठेवता आपले कर्तव्य करणे.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।

मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि॥ (2.47)

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

अर्थ - तुला फक्त कर्म करण्याचा अधिकार आहे. फळावर नाही फळाच्या इच्छेने कर्म नकोस आणि कर्म टाळण्याचाही प्रयत्न करु नकोस.

**वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिने नैतिकतेचा पाया:-** जेव्हा आपण निकालाची चिंता सोडतो, तेव्हा आपण भ्रष्ट मार्गाचा वापर करत नाही. प्रामाणिकपणे काम करणे हीच खरी नैतिकता आहे.

**समत्व आणि समानता (Equality):** "वसुधैव कुटुंबकम्" साठी भेदाभेद नष्ट होणे आवश्यक आहे गीता सांगते

विद्याविनयसम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि।

शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः॥ (5.18)

**अर्थ:-** ज्ञानी पुरुष, विद्यासंपन्न ब्राम्हण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाळ या सर्वांकडे समभावाने (समानतेने) पाहतात.

वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिने नैतिकतेचा पाया:- सर्व प्राणिमांत्रामध्ये एकच चेतना (आत्मा) पाहणे हा जागतिक बंधुभावाचा सर्वोच्च विचार आहे.

**लोकसंग्रह (Social Weljare):** समाजाचे कल्याण करणे हे प्रत्येक व्यक्तिचे नैतिक कर्तव्य आहे.

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः।

लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि॥ (3.20)

**अर्थ:-** राजा जनकासारखा थोर पुरूषांनी केवळ कर्म करुन सिद्धी प्राप्त केली समाजाचे कल्याण (लोकसंग्रह) लक्षात घेऊन तु तुझे कर्म केले पाहिजे.

**वसुधैव कुटुंबकम् दृष्टिने नैतिकतेचा पाया:-** आपले आचारण असे असावे की ज्यामुळे समाजाचे भले होईल स्वार्थापेक्षा समाजहित मोठे मानने ही नैतिकता आहे.

**स्वधर्म Personal Ethics/Integrity:** आपल्या मुळ स्वभवानूसार वागणे.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात्।

स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः।। (3.35)

**अर्थ:-** दुसऱ्या धर्माचे (कर्तव्याचे) उत्तम पालन करण्यापेक्षा स्वतःच्या धर्माचे (कर्तव्याचे) उणेपणाने का होईना पालन करणे श्रेष्ठ आहे.

**वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिने नैतिकतेचा पाया:-** प्रत्येकाने आपआपल्या नैतिक जबाबदाऱ्या आणि मर्यादा ओळखून वागणे हीच खरी कर्तव्यनिष्ठता आहे.

**अहिंसा आणि सत्य नैतिक आधार**

अहिंसा आणि सत्यता हा नैतिकेचा आधार आहे.

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम्।

दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम्।। (16.2)

**अर्थ-** मन, वाणी देहाने कोणलाही कष्ट न देणे, सत्य बोलने क्रोध न करणे, कर्माच्या फळाचा त्याग, चित्ताची शांती कोणचीही निंदा न करणे, सर्व प्रांण्यावर दया, विषयांचा लोभ न ठेवणे, कोमलता आणि व्यर्थ चेष्टा नकरणे.

वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिकोनातून: दया भूतुत्व (सर्व प्रांण्यावर दया) हा श्लोकाचा मुख्य गाभा आहे जेव्हा आपण संपूर्ण जगाला कुटुंब मानतो तेव्हा केवळ मानवावरच नाही तर निसर्ग आणि मुक्या प्राण्यांवरही दया करणे हे आपले कर्तव्य ठरते.

**असूरी प्रवृत्तींचा त्याग (अडथळे दूर करणे):** चुकीचा स्वभावधर्म विकासाला अडथळे ठरतात.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

दम्भो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च।

अज्ञानं चाभिजातस्य पार्थ सम्पदमासुरीम्।। (16.4)

**अर्थ-** दांभिकपणा, घमेंड, अभिमान, क्रोध, कठोरता आणि अज्ञान ही लक्षणे असूरी संपत्ती घेऊन जन्माला आलेल्या माणसाची आहेत.

**वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिकोनातून नैतिकतेचा पाया:-** हे सर्व गुण कुटुंब तोडणारे आहेत जर जगात द्वेष आणि युद्धे थांबवयाची असतील तर या असुरी प्रवृत्तींची त्याग करणे हेच वसुधैव कुटुंबकमच्या दिशेने पहिले पाऊल आहे.

## विनाशाची तीन व्दारे / विनाशापासून मुक्ती

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः।

कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ (16.21)

**अर्थ-**काम(वासना)क्रोध आणि लोभ हे आत्माचा नाश करणारे नरकाचे तीन दरवाजे आहेत म्हणून या तिन्हींचा त्याग करणेच योग्य आहे.

**वसुधैव कुटुंबकमच्या दृष्टिकोनातून नैतिकतेचा पाया:-** जगातील बहुतांश संघर्ष हे लोभ (दुसऱ्याचे ओरबडण्याची वृत्ती) आणि क्रोध यामुळे होतात. या तिन्हींचा त्याग केल्यास माणुस खऱ्या अर्थाने जागतिक नागरिक (Clobal Citizen) बनू शकतो.

अशा प्रकारे वरील श्लोकांच्या आधारे नैतिकतेची शिकवण श्रीमद्भगवतगीता आपणास शिकविते.

**निष्कर्ष :-** "वसुधैव कुटुंबकम् या संकल्पनेच्या परिपेक्ष्यातून श्रीमद्भगवद्गीतेतील तत्वज्ञान: "नैतिकतेचा पाया" या शोध निबंधाच्या अभ्यासाअंती असे स्पष्ट होते की, 'वसुधैव कुटुंबकम्'ही संकल्पना केवळ एक प्राचीन आदर्शवाद नसून, श्रीमद्भगवद्गीतेच्या तत्वज्ञानावर आधारलेली एक व्यावहारिक जीवनपध्दती आहे. गीतेने दिलेला नैतिक पाया या जागतिक एकात्मतेच्या संकल्पनेला अधिक बळकट करतो या संशोधनात I) सर्वसमावेशक विकास (Inclusivity) II) आध्यात्मिक लोकशाहीचा पाया (Spiritual Demorcracy) जेव्हा मनुष्य दुसऱ्यामध्ये स्वतःचाच अंश पाहतो, तेव्हा शोषण, हिंसा आणि द्वेष यांना थारा उरत नाही. हाच विचार जागतिक शांततेसाठी अनिवार्य आहे III) मानवी हक्कांकडून मानवी कर्तव्यांकडे IV) शाश्वत समाधानाची गुरूकिल्ली हे या संशोधनाचे फलित आहे. थोडक्यात सांगायचे तर 'वसुधैव कुटुंबकम्' हे जर ध्येय असेल, तर 'श्रीमद्भगवद्गीता' हा त्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा मार्ग आहे. गीतेचे तत्वज्ञान संकुचित राष्ट्रवाद आणि व्यक्तिगत स्वार्थाच्या पलीकडे जाऊन 'विश्वबंधुत्वाचा' एक ठोस नैतिक आराखडा जगासमोर मांडते. 21 व्या शतकातील युध्दाच्या छायेखालील जगाला वाचवण्यासाठी श्रीमद्भगवद्गीचा हा नैतिक पायाचा एकमेव आधार ठरू शकतो. आणि भारतात हा श्लोक सार्थ होण्यास वेळ लागणार नाही.

सवे भवन्तु सुखिनः

सवे सन्तु निरामयाः

सवे भद्राणि पश्यन्तु।

मा कश्चिद दुःखभग्भवेत।।

## आधार ग्रंथसूची

वानरे, राजु, झेप घेतली आकाशी, टारगेट पब्लिकेशन, 2021.

Balodhi and Keshavan, M. S. (2011). Bhagavadgita and psychotherapy, AJP, 4(4), pp. 300–302.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

https://sanatanprabhat.org/marathi/634494.html, 09 Dec 2022 | 12:23 AM, भगवदगीतेचे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक. Hkxonxhrsps विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक.

जरारे, वि. (1995). संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, 35-ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर.

स्वामी रंगनाथन, भगव्द्गीतेचा सार्वजनिक संदेश, रामकृष्ण् मठ, नागपूर, 2016.

जोशी, एन., गीतामृत, मंगेश प्रकाशन, नागपूर.

Nagar, P. (2021). Critical Analysis of Bhagavad Gita's Lessons on Education. GIEO Gita International Research Journal, 1(2), 33-38.

Kumar, S. (2017). Well-being of adolescents: Reflections from Bhagavad Gita, Indian Journal of Health and Wellbeing, 8(6), pp. 538-543.

Aathira, K. U. (2022). Bhagavad Gita as a guide to improve mental health, NAIVIGYAN- A collection of Multidisciplinary Research Stud, 3(3), pp. 89-94.

Bansal, A and Srivastava, S. (2024). The Significance of the Bhagavad Gītā Philosophical Principles in Contemporary Education Systems, An Online Peer Reviewed / Refereed Journal, 2(9), pp. 142-156.

Kumari, K. (2025). Spiritual Intelligence through the Lens of the Bhagavad Gita: A Route to Mental Wellness. Ushus Journal of Business Management, *24*(3), 23 - 48.

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985